ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

महिला सक्षमीकरण एक काळाची गरज

*डॉ. बोंडगे एस. जी.

* वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा.

प्रस्तावना:

दैनंदिन जीवनामध्ये महिला अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत असतात. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये महिलांना दुय्यम स्थान दिले जाते त्यामुळे महिला विविध क्षेत्रात संधीपासून दुरावल्या जातात. त्या आपल्या कलागुणांचा व कौशल्याचा आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात पूर्णतः वापर करू शकत नाहीत. ज्यामुळे त्या विकासाच्या प्रवाहात संपूर्ण योगदान देऊ शकत नाहीत. अनादी काळापासून महिला वरील ही बंधने त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाच्या आड येत आहेत.

श्री. श्री. रविशंकर जी म्हणतात, सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा, अत्याचार आणि आर्थिक परावलंबित्व यातून स्त्रियांची सुटका व्हायची असेल तर गरज आहे महिला सक्षमीकरणाची, प्रथम आपण सक्षम आहोत याची खात्री स्त्रियांनी बाळगणे गरजेचे आहे. आपण स्त्री आहोत या आत्मग्लानी मध्ये कधीही राहू नका जेव्हा तुम्ही आत्मग्लानी मध्ये येता तेव्हा ऊर्जा, उत्साह आणि सामर्थ्य गमावता.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) महिला सक्षमीकरणाचा अर्थ समजून घेणे.

२) महिला महिला सक्षमीकरणाचे मार्ग जाणून घेणे.

३) भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरणाची धोरणे अभ्यासणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम आधारसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, मासिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे काय?

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या स्वाभिमानाची भावना वाढवणे याचा अर्थ त्यांचा कमकुवत पणा ओळखून त्यावर मात करण्याची त्यांची क्षमता ठरवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना मदत करणे. महिलांचे सक्षमीकरण त्यांना समाजात स्वतःसाठी एक पाऊल उचलण्यास प्रवर्त करते. महिला सक्षमीकरणाचा उपयोग सर्व जाती, पंथ आणि रंगाचा विचार न करता महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी देण्यासाठी केला जातो. महिला सक्षमीकरण असा विचार

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

त्यांना शक्तिशाली बनवण्यासाठी केला जातो जेणेकरून त्या त्यांच्यासाठी योग्य आणि अयोग्य हे ठरवू शकतील.

पूर्वी समाजामध्ये पुरुषांना सर्वोच्च मानले जात होते. सर्व निर्णय पुरुषाकडून घेतले जात होते आणि कुटुंबासाठी तो एकमेव भाकरी मालक असे. मुलांचे संगोपन आणि घरातील काम पाहणे ही महिलांची जबाबदारी मानली जात होती. एका विशिष्ट वयानंतर महिलांना काम करण्याची किंवा अभ्यास करण्याची परवानगी नव्हती लहान वयात त्यांचे लग्न होत असे आणि नंतर त्यांच्या पतीच्या कुटुंबाची काळजी घ्यावी लागते कामाची विभागणी लिंगानुसार केली जायची कौशल्यासाठी नाही.

1987 मध्ये विनेसा ग्रिफन यांनी युनोच्या जागतिक महिला स्तरावरील कार्यशाळेत महिला सबलीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

स्त्रीसक्षमीकरण म्हणजे, स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतीशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, संस्था संपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी. करण्याची क्षमता व आवड निर्माण करणे त्यास महिला सबलीकरण म्हणतात.”

“महिला सबलीकरण म्हणजे मानवी व्यवहारांच्या सर्वच पातळीवर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे”.

“कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी संदीप उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात”.

स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत पुढील मुद्दे प्रामुख्याने महत्त्वाचे ठरतात

१) लैंगिक आरोग्य २) नैसर्गिक साधन संपत्तीची राखणावळ,३) आर्थिक सक्षमता ४) शैक्षणिक सक्षमता ५) राजकीय सक्षमता ६) मानसिक सक्षमता.

सबलीकरण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे याकरिता महिलांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे त्याचबरोबर समाजाचा धार्मिक रूढीवादी दृष्टिकोन बदलणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

भारतात महिला सक्षमीकरणाची गरज आहे का?

स्त्रीचा जन्म कुठे असो ग्रामीण असो वा शहरी त्यांना मूलभूत शिक्षण दिले पाहिजे आणि त्यानंतर तिच्या जीवनाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यातील दिले पाहिजे. महिलांना केवळ शिक्षण शिक्षणाच्या मदतीने सक्षम केले जाऊ शकते कारण ते त्यांना काय योग्य आणि काय अयोग्य यातील फरक करण्यास शिकवेल. महिला सक्षमीकरण केवळ स्वतःसाठीच नाही तर समाजासाठी आवश्यक आहे आपल्या प्रवर्तेतील थोडासा बदल समाजात काय फरक आणू शकतो हे एक सशक्त महिलाच इतरांना शिकवू शकते. स्त्री शिक्षण केवळ तिलाच नव्हे तर कुटुंबालाही सक्षम बनवते आजकाल बऱ्याच आयटी कंपन्या आणि अग्रगण्य व्यवसायिक कंपन्यांमध्ये महिलांनी व्यापलेली सर्वोच्च पदे आपल्याला आढळतात ते वंचितांना कठोर परिश्रम करण्याची आणि जीवनात यशस्वी व्यक्ती बनण्याची प्रेरणा देतात.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

भारतात स्त्री - पुरुष समानताबाद 1970 च्या दशकानंतर सक्रिय झाला. 1990 च्या दशकामध्ये परदेशी संस्थाकडून मिळालेला अनुदानामुळे स्त्रियांसाठीच्या नवीन एन.जी.ओ ची स्थापना करण्यास मदत मिळाली. भारतात स्वयंसहायता गट आणि सेल्फ एम्प्लॉईड वुमन्स असोसिएशन सारख्या स्वयंसेवी संघटनांनी स्त्रियांच्या हक्काबाबत महत्त्वाची भूमिका वाढविली.

स्त्रियांच्या स्थितीचा विचार करता शिक्षण व राजकीय प्रतिनिधित्व याबाबतीत भारताची स्थिती सुधारली असली तरी आर्थिक स्तर व आरोग्य या क्षेत्रात अद्याप मोठा पल्ला गाठायचा आहे. या दोन्ही बाबतीत सरकारची भूमिका महत्त्वाची आहे.

स्त्रियांना वास्तविक त्यांच्या क्षमता ची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा सर्व संमत अधिकार मिळणे ही भारतासारख्या शक्तिशाली देशासाठी काळाची गरज आहे.

स्त्री सक्षमीकरणाच्या योजना:

शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरी 30 टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्था पन्नास टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात. महिलांची सुरक्षितता संरक्षण आणि सक्षमीकरण या उद्देशाने सर्वांकष योजना म्हणून केंद्र सरकारने 15 व्या वित्त आयोगाच्या वर्ष 2021-22 ते 2025 - 2026 या कार्यकाळातील अंमलबजावणी करिता शक्ती अभियान हा एकात्मिक महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरू केला आहे. शक्ती अभियानाचे नियम 1 एप्रिल 2022 पासून लागू झाले आहेत.

महाराष्ट्र शासनाने 1994 मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले त्यात काल सुसंगत बदल करत 2001 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रिया वरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वयंसहायता बचत गटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो.

महिला सबलीकरण योजना:

भारत सरकारने महिला व बालकल्याण मंत्रालयामार्फत खालील योजना राबविल्या आहेत.

१) बेटी बचाव बेटी पढाव.
२) वन स्टॉप सेंटर योजना.
३) महिला हेल्पलाइन योजना.
४) उज्वला योजना.
५) कार्यरत महिला वस्तीगृह.
६) स्वाधारगृह.
७) स्त्री शक्ती पुरस्कार आणि नारी शक्ती पुरस्कार.
८) राज्य महिला सन्मान आणि जिल्हा महिला सन्मान पुरस्कार.
९) महिला शक्ती केंद्रे. (M.S.K.)
१०) निर्भया.
११) महिला बचतगट.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

महिला सक्षमीकरणा करता उपाय :

१) आज महिला सक्षमीकरणाकरता सर्वप्रथम समाजामध्ये महिलांचे अधिकार व मूल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात हुंडा प्रथा स्त्रीभ्रूणहत्या निरक्षरता लैंगिक अत्याचार असमानता इत्यादींचा नाश करणे गरजेचे आहे.

२) लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे.

३) सामाजिक घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध कठोर कायदे व उपाययोजना करणे.

४) महिलांना शारीरिक सामाजिक आर्थिक व मानसिक स्वरूपात सक्षम बनवणे ही समाजाची जबाबदारी आहे.

५) स्त्री शक्तीचे आरोग्य शिक्षण संस्कार व स्वावलंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजामध्ये स्वराज्य दिसेल.

६) भारत देशास पूर्ण विकसित बनवण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष पूर्ण करण्यासाठी महिला सक्षमीकरण महत्त्वाचे ठरेल.

७) समाजामध्ये स्त्री शक्तीचे महत्व व अधिकार जागृत करण्याचे काम करणे.

८) आर्थिक सक्षमीकरणासाठी महिलांनी स्वतःच पुढाकार घेणे गरजेचे आहे संधीची वाट पाहण्याऐवजी महिलांनी स्वतः संधी निर्माण करून त्याचे सोने करावे.

समारोप:

समाजामध्ये घडलेले अनेक महापुरुष हे स्त्री मुळे घडले आहेत. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी. टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी भारत देशाचा नावलौकिक वाढविला आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे मानवी व्यवहारांच्या सर्वच पातळीवर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

भारतामध्ये स्त्री पुरुष समानता वाद 1970 च्या दशकानंतर सक्रिय झाला भारतामध्ये केंद्र व राज्य शासन महिलाच्या सक्षमीकरणाकरिता सर्वंकष प्रयत्न करत आहे व त्या दृष्टीने महिला धोरणे राबवीत आहेत.

संदर्भ:

1. https://www.artofiving.org
2. https://www.mahadunews.com
3. https://mr.m.wikipedia.org.
4. https://Marathivachan.com
5. https://Divyamarathi.bhaskar.com
6. https://www.eskal.com
7. https://Marathiindiatimes.com
8. https://kokaniudyojak.com

Cite This Article:

डॉ. बोंडगे एस. जी. (2025). **महिला सक्षमीकरण एक काळाची गरज. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal:** Vol. XIV (Number I, pp. 72–75). Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16445756